# गोवा टॅमनार ट्रान्समिशन लाईन विषयी माहिती देणारे टूलकिट

## ट्रान्समिशन लाईन प्रकल्पात सध्या काय सुरू आहे याविषयीची सविस्तर माहिती.

नरेंद्रच्या (सध्या असलेल्या) एका सर्किटमध्ये लिलो(LILO) घालणे - शेलडे येथे नरेंद्र (नवीन) ४०० केव्ही डायरेक्ट करंटची क्वाड ट्रान्समिशन लाईन

गोवा- टॅमनार चा ४०० केव्हीचा ट्रान्समिशन लाईन प्रकल्प हा असा वीज प्रकल्प आहे की ज्यामुळे गोव्यातील वनसंपदा धोक्यात येणार आहेत.यामुळे गोव्यातील सर्वाधिक संरक्षित असलेले मोले राष्ट्रीय उद्यान आणि भगवान महावीर वन्यजीव अभयारण्य धोक्यात येणार आहे. तसेच यामुळे वनभागात न येणाऱ्या काही खाजगी जमिनीही जाणार आहेत.(आकृती १)

गोवा- टॅमनर ट्रान्समिशन लाईन प्रकल्पानुसार गोव्यामध्ये खालील गोष्टी होणार आहेत.
तीन ट्रान्समिशन लाईन्स
- लिलो नरेंद्र लाईन
- शेलडे - शेलडे
- शेलडे - म्हापसा

सांगोड गावात एक सब स्टेशन




आकृती १ : पश्चिम घाटातून गोवा ते कर्नाटक येथे जाणाऱ्या ट्रान्समिशन लाईनचा नकाशा (संदर्भ : टेक्नॉलॉजी फॉर वाईल्डलाईफ)

वापरकर्त्यांनी या एकाच प्रकल्पाचे चार भागात विभाजन करून ,जंगलाचे क्रमशः चार भागात विभाजन करण्याची परवानगी मागितली आहे. याशिवाय पाचव्या वन विभाजनासाठी कर्नाटक येथे नरेंद्रच्या (सध्या असलेल्या) एका सर्किटमध्ये लिलो(LILO) - नरेंद्र (नवीन) ४०० केव्ही डायरेक्ट करंटची क्वाड ट्रान्समिशन लाईन घालण्यासाठी परवानगी मागितली आहे.(FP/KA/TRANS/37754/2018)

त्यामुळे या एका प्रकल्पासाठी जंगलाचे पाच ठिकाणी विभाजन करण्याची परवानगी मागण्यात आली आहे.यामध्ये एकूण ३२३.५९६ हेक्टर वनजमीनीचे विभाजन करण्याची परवानगी मागितली आहे.यातील १४६.५०५ हेक्टर जमीन गोव्याची तर १७७.०९१ हेक्टर जमीन कर्नाटक मधील आहे.

ही ट्रान्समिशन लाईन अनेक जिल्ह्यांमधून,राज्यांमधून जाणार आहे. या प्रकल्पामुळे वनांवर होणाऱ्या विपरीत परिणामांबाबत कर्नाटक वनखात्याचे अनेक अधिकारी उघडपणे बोलले आहेत.अशा प्रकारे या वीज प्रकल्पामुळे स्थानिक पातळीवरील लोकांची काळजी समोर आली आहे.




पश्चिम घाटातून जाणाऱ्या ट्रान्समिशन लाईन्सचा नकाशा संदर्भ टेक्नॉलॉजी फॉर वाईल्डलाईफ

मोले राष्ट्रीय उद्यान आणि भगवान महावीर वन्यजीव अभयारण्याच्या बाबतीत बोलायचे झाल्यास या भागात सुमारे ३.१५ किमीची ट्रान्समिशन लाईन बांधण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

हा प्रकल्प अशा मोठ्या प्रकल्पांचा भाग असू शकतो की ज्या प्रकल्पांमध्ये गोव्यातील मोठ्या प्रमाणातील वन्यसंपदा
छाटून टाकण्याची परवानगी मागण्यात आली आहे.

गोवा टॅमनार कोण आहेत?
ते मोठ्या कार्पोरेट हाऊसेसशी कसे संबंधित आहेत ?
त्यांना पोलिस सुरक्षा का पुरविण्यात आली आहे?

गोवा टॅमनार हे स्टरलाईट पॉवरचे स्पेशल पर्पज व्हेईकल आहे.स्टरलाईट पॉवर ही व्हॉलकॅन होंल्डिंगज यांची दुय्यम कंपनी आहे.त्याशिवाय व्हॉलकॅन होंल्डिंगज हे वेदांता रिसोर्सेस आणि स्टरलाईट टेक्नॉलॉजी लिमिटेड मध्ये मोठे भागदारक आहेत.

गोव्यामध्ये स्टरलाईट पॉवरला हा प्रकल्प मंजूर होण्यापूर्वीच फेब्रुवारी २०१९ मध्येच पोलीस संरक्षण देण्यात आले'हा प्रकल्प ७ एप्रिल २०२० मध्ये मंजूर करण्यात आला.

1.https://www.sterlitepower.com/project/goa-tamnar-transmission-project-limited
2.https://www.sterlitepower.com/sites/default/files/jobs/downloads/Role-Spec-Head-OSM.pdf

OFFICE OF THE COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE,
SOUTH GOA DISTRICT
Magisterial Branch,
Matanhy Saldanha Administrative Complex,
Near KTC Bus Stand, Margao-Goa
Phone: 0832-2794810, Fax: 0832- 2794402
*Email: magbr-cols.goa@nic.in*

No. 37/27/2016/MAG/Police Protection/X/ 2330 dated :- 18/2/2019

**MEMORANDUM**

Sub :- Construction of Xeldo-Xeldom(Existing) 220 kV HTLs D/c Line. Requesting administrative support for starting construction activities in South Goa.

Find enclosed herewith copy of an application dated 11/02/2019 alongwith enclosure received from Manager-Front Creation & Row, Sterlite Power, Goa-Tamnar Transmission Project Limited, A2/2, Second Floor, New Horizons, DB Marg, Miramar, Panjim,Goa on the above cited subject.

In this regard, you are directed to provide necessary administrative support and police protection in the matter.

( Agnelo A.J.Fernandes)
District Magistrate
South Goa, Margao

Encl: As above.
To,
The Deputy Collector & SDM,Quepem/Sanguem/Dharbandora.

Copy to: The Manager-Front Creation & Row, Sterlite Power, Goa- Tamnar Transmission Project Limited, A2/2, Second Floor, New Horizons, DB Marg, Miramar, Panjim,Goa

Police protection given to Goa Tamnar and Sterlite Power

## भारतातील अन्य ठिकाणी स्टरलाईटचा
## मानवी हक्कांबाबतचा इतिहास काय आहे ?

स्टारलाईटने १९९४ साली तामिळनाडूच्या ठुथ्थुकुडी येथे आपला पाया भक्कम केला.त्याआधी महाराष्ट्रातील रत्नागिरी येथील संवेदनशील पर्यावरणाचा ऱ्हास केल्याने स्टारलाईटला तेथे विरोध झाला होता.

ऑगस्ट १९९४ मध्ये तामिळनाडू सरकारच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्टरलाईटलाना हरकत प्रमाणपत्र दिले.त्यावेळी त्यांना  पर्यावरणावर पडणाऱ्या प्रभावाचे मूल्यांकन करण्यास सांगितले होते.मन्नारच्या खाडीचे पर्यावरणीय महत्व लक्षात घेता फॅक्ट्री बांधताना या खाडीपासून २५ किमी दूर बांधावी अशी अट घालून ना हरकत दाखला देण्यात आला होता.

परंतु या अटीचा भंग करून ही फॅक्ट्री मन्नारच्या खाडीपासून १४ किमीच्या अंतरावर बांधण्यात आली. या फॅक्ट्रीच्या विरोधात आंदोलन करण्याऱ्या जनतेला पोलीस प्रशासन तसेच जिल्हा प्रशासनाने दाबून टाकले.

यानंतर येथे आरोग्य आणि पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या.

१. तामिळनाडू सरकारच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाने काही अटी घालून फॅक्ट्रीला ना हरकत दाखला दिला होता. यामध्ये फॅक्ट्री मुन्नारच्या आखतापासून २५ किमीच्या अंतरावर असावी अशी आत होती पण या अटीचे पालन न करता फॅक्ट्री मुन्नारच्या आखतापासून १४ किमीच्या अंतरावर बांधण्यात आली.

२.तामिळनाडू सरकारच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाने फॅक्ट्री चालू करण्याचा परवाना देताना फॅक्ट्री भोवती २५ किमीच्या ग्रीन बेल्ट बांधवा अशी अट घातली होती. ही अटही पूर्ण करण्यात आली नाही.

३.याफॅक्ट्री मधून अनेकदा गॅस गळती झाली होती(नीरीच्या अहवालानुसार) या गॅस गळतीमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या होत्या.

४.जी उत्पादने तयार करण्याची परवानगी मिळाली नव्हती अशी उत्पादनेही तयार करण्यात आली तसेच परवानगीपेक्षा जास्त उत्पादन करण्यात आले.

५.भूजलात आर्सेनिक, लीड,सेलेनियम,अल्युमिनियम तसेच कॉपर अशी घातक रसायने सोडून प्रदूषण करण्यात आले.

६.ऑनलाईन वायू मॉनिटर्समध्ये छेड छाड केले असण्याची शक्यता(नीरी)

७.बांधकाम परवाना मिळण्याआधीच प्रस्तवित वाढीव आराखड्यानुसार अनेक प्लांट बांधण्यात आले.

८.स्टरलाईटने तामिळनाडू प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या सूचनेनुसार येथे आरोग्य चाचणी करण्यात आली. यामध्ये असे दिसून आले की या फॅक्ट्रीच्या आजूबाजूस राहणाऱ्या पुरुषांमध्ये ब्रेन ट्युमरचे प्रमाण हे राष्ट्रीय प्रमाणापेक्षा १००० पटीने जास्त आहे.येथील लोकसंख्येच्या अभ्यासानुसार एकूण मृत्यूपैकी १२% मृत्यू हे मज्जातंतूशी निगडित होते.स्टरलाईट कडून मोठ्या प्रमाणात बाहेर सोडल्या जाणाऱ्या मर्क्युरीमुळे हे घडले असे मानण्यात येते.

९.२३ मार्च २०१३ रोजी झालेल्या मोठ्या गॅस गळतीमुळे लोकांना डोळ्यांना खाज येणे,खोकला,गर्भपात तसेच अन्य समस्यांना तोंड द्यावे लागले.यावेळी हवेतील सल्फरडाय ऑक्साईडचे प्रमाण हे परवानगी मर्यादेपेक्षा तीनपट अधिक होते.

१०.स्टरलाईट बंद करावे अशी मागणी करणाऱ्या लोकांवर पोलिसांचा गोळीबार.यामध्ये एकूण १३ जणांचा मृत्यू झाला.या घटनेला ठुथ्थुकुडी संहार असे नाव देण्यात आले.यामध्ये शेकडो लोक जखमी झाले होते तसेच अनेक जखमी लोक नंतर मृत्युमुखी पडले.

गोवा शासनाने श्वेत पत्रिका काढण्यास कसा नकार दिला याची क्रमवार माहिती.

२३ ऑक्टोबर २०१८ : ननिलेश काब्राल यांनी सांगितले की ते विद्युत खात्याबाबत ४५ दिवसांच्या आत श्वेतपत्रिका सादर करतील.त्यांनी यामध्ये सार्वजनिक - खाजगी भागीदारी आणि वीज दरातील वाढ याबाबत संकेत दिले.

१६ जानेवारी २०१९  : यादिवशी काब्राल म्हणाले की विद्युत खाते हे मृतावस्थेत असल्याने ते याच्या कार्याबाबत श्वेतपत्रिका काढू शकत नाहीत."मला सांगितले होते की मी  श्वेतपत्रिका देणार आहे (खात्याच्या कामकाजा बाबत).पण मी ती देऊ शकत नाही.सध्या खाते हे मृतावस्थेत आहे आणि त्याला जगवायला काय करायचे आहे याबाबत मला विचार करावा लागेल."

२१ ऑक्टोबर २०२० : गोव्याचे पर्यावरण आणि वीजमंत्री निलेश काब्राल यांनी गोव्याच्या विजेच्या वापरावर श्वेतपत्रिका काढली.

गोवा टॅमनार सारख्या खाजगी कंपनीकडून ४०० केव्हीची ट्रान्समिशन लाईन घालण्याबाबत विरोध सुरू असताना अशा पद्धतीने श्वेतपत्रिका सादर करणे म्हणजे या विरोधाला दिलेली प्रतिक्रिया आहे असे गृहीत धरणे चुकीचे आहे का?

याशिवाय श्री काब्राल यांनी श्वेतपत्रिकेत गोव्याच्या वीज वापराविषयी चुकीची माहिती दिली आहे. यामध्ये ते म्हणतात की "गोव्यातील घरगुती वापरासाठी लागणाऱ्या विजेचा लोड हा व्यापारी आणि औद्योगिक कारणांसाठी लागणाऱ्या विजेच्या लोडच्या गरजेपेक्षा दुपटीहुन जास्त आहे."३

हे विधान चुकीचे आहे कारण १९ व्या इपीएस कागदपत्रात स्पष्टपणे लिहले आहे की गोव्याच्या वीज गरचेच्या अंदाजानुसार २०२१-२०२२ या वर्षात औद्योगिक आणि व्यापारी ग्राहक हे ३१२२ दशलक्ष युनिट वीज वापरतील तर घरघुती ग्राहक हे १२८० दशलक्ष वीज वापरतील.
टक्केवारी नुसार बघायचे झाल्यास घरगुती वापर केवळ २६.९१% आहे तर व्यापारी आणि औद्योगिक वापर हा ६५.६३% आहे.तर उर्वरीत ७.४६% वापर हा सार्वजनिक वीज ,पाटबंधारे यांचा आहे.थोडक्यात भाकीत केलेल्या अंदाजानुसार विजेचा औद्योगिक व व्यापारी वापर हा घरगुती वापरापेक्षा २.४ पटीने जास्त आहे.ही आकडेवारी दर्शविते की श्री काब्राल हे जनतेसोबत खोटं बोलले आहेत.

वीज आणि पर्यावरण मंत्र्यांना खोटं बोलण्याची मुभा का देण्यात आली?

स्टरलाईटचा वीज प्रकल्प असलेल्या गोवा टॅमनार बद्दल काळजी व्यक्त केली जात आहे.

१.पर्यावरणीय
१८ जून २०२० रोजी १५० शास्त्रज्ञांनी केंद्रीय इम्पोवर्ड समितीला पत्र लिहले.( राष्ट्रीय वन्यजीव आयोगाचा ट्रान्समिशन लाईन संबंधित अजेंडा आयटम ५७.३.२)
जरी इआयए अहवाल जमा केला गेला असला तरी तो सार्वजनिक पद्धतीने उपलब्ध नाही आणि राज्य वन्यजीव सल्ला आयोगाच्या सदस्यांना बैठकीपूर्वी दोन्हीही प्रकल्पाच्या इआयएची छाननी करु दिली नाही.
राज्य वन्यजीव आयोग आणि केंद्रीय वन्यजीव आयोगाच्या बैठकीच्या वृत्तांतात वापरकर्ती संस्था नेमकी किती झाडे पाडणार आहेत याविषयी स्पष्टपणे नमूद केलेले नाही.
त्यामुळे सदस्यांनी घेतलेला निर्णय हा माहितीपूर्ण निर्णय होता असे म्हणता येणार नाही. हाय टेन्शन टॉवर जिथे उभा करणार आहेत त्या जागेवर जाण्यासाठी केवळ एक छोटी पायवाट आहे,त्यामुळे सर्व बांधकाम सामग्री तिथवर पोहचेपर्यंत पर्यावरणाची हानी होणार आहे.

२ डिसेंबर २०१९  ला राज्य वन्यजीव आयोगाच्या बैठकीतीच्या वृत्तांतात म्हणले आहे की "जैव विविधतेवर होणाऱ्या परिणामांचा आणि जैव विविधता व्यवस्थापन आराखडा हा गुडगाव येथील इएमआर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी तयार करून सादर केला आहे." या अहवालाची प्रत सार्वजनिक व्यासपीठावर उपलब्ध नाही.

वटवाघूळ आणि उडणाऱ्या खारींवर सारख्या सस्तन प्राण्यांवर तसेच झाडांवर राहणाऱ्या स्लेनडेर लॉरीस,जायंट स्कवीरल,बोनेट माकाक्यु आणि ग्रे लंगूर सारख्या प्रजातींवर या ट्रान्समिशन लाईनचा काय परिणाम होतो याचा अजून अभ्यास झालेला नाही.उदाहरणार्थ ट्रान्समिशन लाईन जेथून जाणार आहे तिथे झाडांचे छप्पर नसल्याने हे प्राणी या इलेक्ट्रिक वायर लाईन्सचा वापर करून प्रवास करण्याचा प्रयत्न करतात यामुळे त्यांचा मृत्यू होतो.
या प्रकल्पाला ३५ वर्षांची मंजुरी हवी आहे या कालावधीत ट्रान्समिशन लाईन खालील वाढलेली झाडे नियमितपणे कापली जातील.
हा प्रकल्प संरक्षित क्षेत्रातुन जात असल्याने ही गोष्ट खूपच काळजी करण्यासारखी आहे

(मोले मधील झाडे कापल्याबद्दल कारवार येथे तीन ठिकाणी वनीकरण करण्यात येणार आहे.या जागा लाल बिंदूनी दर्शविण्यात आल्या आहेत.)



२.लोकांना वाटणारी काळजी

पोलीस संरक्षण
या प्रकल्पांच्या सदस्य मंडळावर जनतेचा प्रतिनिधी आहे का नाही हे कळत नसताना आणि लॉकडाऊनच्या काळात घाई घाईने या प्रकल्पांना मंजुरी दिलेली असताना (७ एप्रिल २०२०) शासन स्टरलाईट पॉवरसोबत ( वेदांताची सहाय्यक) काम करण्यासाठी एव्हढे उतावीळ का आहे ?
हा प्रकल्प मंजूर करण्यापूर्वी (७ एप्रिल २०२०) तसेच अंतिम स्वरूप देण्यापूर्वीच गोव्यामध्ये उपजिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी यांना पोलीस संरक्षक पुरविण्यात आले.

ग्राम सभा झाली नाही
बैठकीच्या वृत्तांतानुसार समजते की बहुतेक पंच सदस्यांनी ४ ऑक्टोबर २०२० रोजी ग्रामसभा बोलवावी अशी मागणी केली होती.पण ५ ऑक्टोबर २०२० रोजी ग्रामसभा न घेताच त्यांनी परवानापत्र देऊन टाकले. सरपंच आणि पंचायत सचिवांनी या परवाना पत्रावर सही केलेली नाही.
यातील अनेक मुद्दे हे रहिवासी बांधकामा संबंधित असून त्यांची छाननी होणे आवश्यक आहे त्यामुळे ते एकाच परवान्यावर पॉवर सबस्टेशन बांधू शकतात का याविषयीच्या कायदेशीर बाबी तपासता येतील.

३.नो ड्युज प्रक्रिया : सार्वजनिक हित आणि कलम १४४
२९ एप्रिल २०१९ तारखेच्या इंडियन एक्सप्रेसच्या बातमीनुसार सबस्टेशनसाठी झाडे कापण्याची परवानगी.
(सबस्टेशनची जागा स्वच्छ करण्यासाठी सांगोड येथे १२ हेक्टरमध्ये २६७१ झाडे कापण्यात येणार आहेत.)
गोवा तामनारची खाजगी जमीन ही विकत घेऊन त्यावर सब स्टेशन बांधण्याची परवानगी ही बहुदा गोव वृक्ष संवर्धन कायदा १९८४ च्या कलम ३१ नुसार दिली असावी.
यामुळे त्यांना कलमांतील तरतुदींचे पालन करण्यापासून सूट मिळते कारण हे लोकहितासाठी केले आहे.
सब स्टेशनमध्ये लोकहितासारखे काय आहे ? आणि असे असेल तर शासन कलम १४४ लावून लोकांना अडथळा का निर्माण करत आहे?
याशिवाय या प्रकल्पामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होते.भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने २०१५ निकाल दिला की गोव्यात १ लाख हेक्टर वरील कोणत्याही जमिनीवर नैसर्गिक वनस्पती आहेत व येथील झाडांच्या छप्पराची दाटी ही ०.१ पेक्षा जास्त असेल तर अशा जमिनींचे रूपांतरण करण्यास ना हरकत प्रमाणपत्र दिले जाऊ नये.
सांगोड येथे सबस्टेशनसाठी ११.८ हेक्टर जमीन देण्यात येणार असून झाडांच्या छप्पराची दाटी ही ०.७ इतकी आहे त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाले आहे.

४.माहिती करून घेणे हा हक्क आहे
झाडे कापण्याची परवानगी सार्वजनिक व्यासपीठावर उपलब्ध नसल्याने लोकांनी त्यांचा या निर्णया विरोधात ३० दिवसाच्या आत आवाहन करण्याचा अधिकार गमावला आहे.हे धोकेबाजी असून यामुळे लोकांच्या माहिती करून घेण्याचा अधिकाराचे उल्लंघन झाले आहे,राज्यघटनेनुसार हा मूलभूत अधिकार आहे.

५. सार्वजनिक क्षेत्रात काही नाही तसेच कामाचा आदेशही नाही
शासन वन (संरक्षण) कायदा १९८० च्या कलम २ नुसार कामाचे आदेश दिले .केंद्रीय वन आणि पर्यावरण खात्याने २९ एप्रिल २०२० रोजी स्टेज एकच्या वन कापण्याची परवानगी दिली.ही परवानगी शेलडे -शेलडे लाईनसाठी ,शेलडे -म्हापसा लाईनसाठी आणि सबस्टेशनला जाण्यासाठी लागणाऱ्या रस्त्याकरीता दिली गेली
राज्य शासनाच्या वन विभागाच्या वेबसाईटवर हा दस्तावेज ठेवण्यात आलेला नाही.

६.जमीन बळकावणे
स्टरलाईट हे गोवा राज्याला वीज विकणार आहे.या व्यापार संरक्षित क्षेत्रातील जमीन वापरून आपली ट्रान्समिशन लाईन पुढे नेणार आहे.सर्वसामान्य परिस्थितीत ही आपला धंदा ज्या जमिनीवर चालतो ती जमीन विकत घेण्यासाठी स्टरलाईटला खूप पैसे खर्च करावे लागले असते पण या केसमध्ये त्यांना **जमीन** फुकटात मिळवण्यासाठी गोवा शासनाकडून केवळ चार सह्या हव्या आहेत.एखादया कंपनीला गोव्याचा नैसर्गिक वारसा फुकटात का द्यावा ?
ही जमीन बळकावण्याची सीमा नाही का?

अरेरे! वातावरणातून प्रस्ताव गूढरीत्या गायब झाला
झाडे कापण्याचा प्रस्ताव तसेच या संबंधी इतर माहिती ( २ ट्रान्समिशन लाईन्स आणि सबस्टेशनकडे जाणार रस्ता) ज्यासाठी २९ एप्रिल २०२० ला स्टेज एकची वन .कापण्याची परवानगी दिली होती ती माहिती केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाच्या वेब पोर्टल वरून गूढरीत्या गायब झाली आहे




-https://indianexpress.com/article/india/over-2600-trees-felled-in-goa-for-power-project-law-loophole-afforestation-delay-6553777/

# ई-मेल

प्रकाश जावडेकर,केंद्रीय मंत्री,केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल खाते - mefcc@gov.in, pjavadekar@gmail.com

बाबूल सुप्रीयो केंद्रीय राज्यमंत्री,पर्यावरण, वन आणि हवामान बदल खाते - babulsupriyo@gmail.com

गोव्याचे मुख्यमंत्री - cm.goa@nic.in

गोव्याचे राज्यपाल - governor.goa@gov.in

श्रीपाद नाईक,उत्तर गोवा खासदार - shripad.naik@sansad.nic.in

फ्रान्सिस सार्दीन्हा,दक्षिण गोवा खासदार -
F.sardinha@sansad.nic.in

गोव्याचे वनमंत्री - mla.curchorem.gvs@gov.in

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल
खात्याचे सचिव - secy-moef@nic.in

वीज खात्याचे सचिव - secy-power@nic.in

वनखात्याचे व्यवस्थापकीय संचालक
dgfindia@nic.in

वनखात्याचे अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक (वन संरक्षण) - adgfc-mef@nic.in

वनखात्याचे महानिरीक्षक (वन संरक्षण)
igfc-mef@nic.in

रमण सुकुमार,सदस्य एनबीडब्ल्यूएल
rsuku@iisc.ac.in

डब्ल्यूआयआयचे संचालक आणि एनबीडब्ल्यूएलचे सदस्य
dwii@wii.gov.in; dmohan@wii.gov.in

गोव्याचे मुख्य सचिव
cs-goa@nic.in

गोवा राज्याचे मुख्य प्रधान वनसंरक्षक
pccf-fore.goa@gov.in

गोवा राज्याचे मुख्य वन्यजीव वॉर्डन (सीडब्ल्यूडब्ल्यूएल) आणि एपीसीसीएफ - apccf.goa@gmail.com, apccf-forest.goa@nic.in

मेसर्स गोवा टॅमनार प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड
nitin.agrawal@sterlite.com

## ट्विटर हॅंडल्स

@moefcc
@PrakashJavdekar
@nitin_gadkari
@moefcc
@DrPramodPSawant
@SterlitePower
@MinOfPower
@PiyushGoyal
@RailMinIndia
@santosh93ifs
@shripadynaik

## फेसबुक

@Moefcc
@DrPramodPSawant
@PrakashJavadekarOfficial @GsbbGoa
@SterlitePower
@PowerMinistryIndia @shripad.naik.16

## इन्स्टाग्राम हॅंडल्स

@moefccgoi
@drpramodsawant
@goaforest
@sterlitepower
@sc_observer

## आमदारांचे इन्स्टाग्राम हॅंडल

मांद्रे - @dayanand_sopte9596
पेडणे - @ajgaonkarbabu
म्हापसा - @joshuadesouzaofficial
साळीगांव - @jayeshvsal
कलंगुट - @michaellobo76
पर्वरी - @rohankhaunteofficial
अल्डोना - @officialglennticlo
पणजी - @babushmonserrateofficial
तालीगांव - @jennifermonserrateofficial
सांता क्रूझ - @officiallytonyfernandes17
सांत आंद्रे - @francisosilveira.mla
कुंभारजुवे - @pandurangmadkaikar
मये - @zantyepravin
साखळी - @drpramodpsawant
वाळपई - @visrane
प्रियोळ - @govindforgoa
शिरोडा -@subhashshirodkr
मोरमुगाव - @milindnaikofficial
वास्को द गामा - @jlcarlosalmeida
दाबोळी - @mauvingodinho
फातोर्डा - @vijai_sardesai
मडगाव - @digambarvkamat
केपे - @babukavlekar